Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे पत्ररूपी गद्य वाङ्मयः एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. शारदा कदम**
मार्गदर्शक
बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत

**दुर्गा बापूसाहेब जाधव**
संशोधक

- **प्रस्तावना :**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कार्य मोलाचे आहे. या कामाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातील व्यक्तीशी झालेला त्यांचा पत्रव्यवहार मौलिक स्वरूपाचा आहे. या पत्रव्यवहाराचा संग्रह ग्रंथ स्वरूपात सन २०१८ मध्ये बाबा भांड यांनी संपादीत केलेला असून महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेला आहे. यापूर्वी हा संग्रह अभ्यासण्यासाठी बडोदा संस्थानातील ग्रंथालयात उपलब्ध होत असे. बाबा भांड यांनी संपादीत केलेल्या पत्रव्यवहाराशिवाय असंख्य पत्रे आजही संपादनाशिवाय दुर्लक्षित आहे. या पत्रव्यवहाराचा वाङ्मयीन छाया संशोधनात्मक अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. असा विस्तृत विचार प्रबंधामध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**गृहितके :**

१. महाराज सयाजीराव गायकवाड निरोगी शरीर, मन असणारे सतत प्रसन्नमुख व्यक्तिमत्व होते.

२. महाराज सयाजीराव गायकवाड यांची व्यायाम, खेळ यावर अपार श्रद्धा होती. ती त्यांनी आयुष्यभर निष्ठेने जोपासली.

३. महाराज सयाजीराव गायकवाड यांना खेळाची आवड होती. यातूनच त्यांनी संस्थानाच्या माध्यमातून खेळासाठी विशेष प्रयत्न केले.

४. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी संस्थानाच्या माध्यमातून क्रीडा धोरण राबविले होते याचा शोध घेणे.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे वाङ्मयीन कार्य भारतीय वाङ्मयाच्या इतिहासामध्ये मोलाचे आहे. ग्रंथ लेखनासाठी प्रोत्साहन, भाषांतरासाठी अनुदान, लेखकांना मानधन इत्यादी स्वरूपाची कामे महाराजांनी वाङ्मयीन चळवळीला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने केलेली आहे. त्यांचे कार्य कौतुकास्पद असून त्या कामाला न्याय देण्याच्या दृष्टीने त्यांचा पत्रव्यवहार अभ्यासने महत्त्वाचे आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या पत्रव्यवहाराचा सर्वव्यापी अभ्यास करताना काही समस्या निर्माण झाल्या या समस्या पुढील प्रमाणे आहेत.

**१. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी वाङ्मय चळवळ सुरू केली. पण...**

म. सयाजीराव गायकवाड महाराज यांनी वाङ्मय लेखनास प्रोत्साहन देण्यासाठी वाङ्मयाची चळवळ निर्माण केली. लेखक, साहित्यिक, विचारवंत यांना ग्रंथ लेखनासाठी संस्थानात आमंत्रित केले. त्यांना पगार चालू केले. मान-सन्मान दिले, नोकऱ्या दिल्या, विशेषत: संस्कृत ग्रंथाचे भाषांतर व इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर या दृष्टीने महाराजांनी केलेले कार्य मौलिक स्वरूपाचे आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी या स्वरूपाचे केलेले कार्य सामाजिक, वाङ्मयीन दृष्ट्या महत्वाचे असूनही अभ्यासकांनी, राज्यकर्त्यांनी या कार्याची फारशी दखल घेतलेली नाही. यामुळे महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचे कार्य वाङ्मयीन दृष्ट्या मौल्यवान असल्याने कार्य अभ्यासकांना उपलब्ध होत नाही. तसेच त्यांच्या कार्याची नोंद उपलब्ध होत नाही.

संशोधकांना त्यांच्या कामगिरीच्या योग्य नोंदी उपलब्ध होत नसल्यामुळे संशोधनाच्या कार्यात समस्या निर्माण होताना दिसतात. या दृष्टीने संशोधनामध्ये प्रामुख्याने विचार केला जाणार आहे.

**२. पत्रव्यवहाराचा ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास पण...**

पत्रव्यवहार हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा असतो. त्या दृष्टीने पत्रव्यवहाराचे मोल अनन्यसाधारण आहे. इतिहास लेखनामध्ये पत्रव्यवहाराचा वारंवार उपयोग करण्यात आलेला आहे. यावरून पत्रव्यवहाराचे ऐतिहासिक संशोधनातील महत्व स्पष्ट होते. पण वाङ्मयीन दृष्ट्या पत्र व्यवहाराला जी अनन्यसाधारण महत्व आहे. पत्रलेखन कर्त्याचे विचार, व्यक्तिमत्त्व, तत्कालीन परिस्थिती, घटना, भाषा, रितीरिवाज, म्हणी-वाक्प्रचार, भाषाशैली, भाषेचे स्वरूप, व्याकरण समजण्यास मदत होते. या दृष्टीने पत्रव्यवहाराचा अभ्यास संग्रह उपलब्ध होणे गरजेचे असते. पण असे काम होताना दिसत नाही.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या पत्रव्यवहाराला ऐतिहासिक दृष्ट्या अनन्यसाधारण महत्व आहे. या दृष्टीने अभ्यास वारंवार झालेला आहे. पण वाङ्मयाच्या दृष्टीने त्यांच्या पत्रव्यवहाराला अनन्यसाधारण महत्व असून देखील अभ्यास झालेला नाही. त्यामुळे हा अभ्यास वाङ्मयाच्या विविध अंगांनी व्हावा लागेल. त्याची व्याप्ती व्यापक असेल. जर अभ्यास यापूर्वी झालेला असता तर त्या अभ्यासाची विकसित स्वरूपामध्ये मांडणी करता आली असती.

यापूर्वी सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या पत्रव्यवहाराचा वाङ्मयीन अभ्यास झालेला असता तर आज नव्याने काही विचार, शोध नोंदविता आले असते. या स्वरूपाचा अभ्यास नसल्यामुळे प्राथमिक स्वरूपातून हे काम करावे लागणार असल्यामुळे अभ्यासावर मर्यादा येताना दिसतात.

**३. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचा पत्रव्यवहार संपूर्ण संग्रह स्वरूपात उपलब्ध होत नाही.**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या दिर्घायुष्याचा, कार्याचा, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यापक कार्याचा विचार करता त्यांचा पत्रव्यवहार विपूल आहे. आज महाराष्ट्र शासन यांनी प्रकाशित केलेला पत्रव्यवहार अल्प स्वरूपात असल्यामुळे हे काम व्यापक पातळीवर होण्याची गरज आहे.

संग्रह स्वरूपात प्रकाशित झालेला महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचा पत्रव्यवहार सहज उपलब्ध होतो आहे. यामुळे संशोधनाचे कार्य सुलभ होण्यास मदत होते आहे. पण जो पत्रव्यवहार उपलब्ध नाही तो उपलब्ध करण्यामध्ये खुप अडचणी येतांना दिसत आहे. ही संशोधनामधील महत्वाची समस्या आहे.

**३. पत्रव्यवहार वाङ्मयाचे महत्त्व**

पत्रव्यवहार हा वैयक्तिक पातळीवर घडत असतो. त्यामुळे त्याचे वाङ्मयीन महत्व फारसे अभ्यासकाच्या दृष्टीस येत नाही. पण पत्रव्यवहार हा वाङ्मय प्रकार आज मोठ्या प्रमाणावर रूजताना दिसतो आहे. कारण पत्रव्यवहारावरून तत्कालीन समाजस्थिती, राजकीय स्थिती, सांस्कृतिक मूल्यव्यवस्था, भाषाशैली, भाषा व्याकरण, भावनात्मक समाजजीवन इत्यादी बाबींचे दर्शन पत्रव्यवहारातून घडत असते.

पत्रव्यवहाराचे वाङ्मयीन महत्व अधोरेखित करून समाज मनामध्ये रूजविण्याची भूमिका अभ्यासकाला पार पाडावी लागणार आहे. समाजमन पत्रव्यवहार अभ्यासासाठी तयार करण्याच्या समस्या प्राधान्याने जाणवतात.

**४. निष्कर्ष :**

१. महाराज सयाजीराव गायकवाड यांचा पत्रव्यवहार वाङमयीन दृष्ट्या व आशयात्मक दृष्ट्या समृद्ध आहे.

२. सयाजीराव गायकवाड यांचा पत्रव्यवहार प्रशासकीय व व्यवहारिक दृष्ट्या व्यामिश्र स्वरूपाचा आहे.

३. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या पत्रव्यवहारातून त्यांचे व्यक्तिमत्त्व आविष्कृत होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. भांड बाबा (संपा) : गौरवगाथा युगपुरूषाची (महाराज सयाजीराव) महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळ मुंबई. २०१७.

२. आपटे, दाजी नागेश : श्री महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र (खंड १,२,३) बडोदा संस्थान, प्रथमावृत्ती १९३३.